# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 22/04/2023 (शनिवार) सकाळ

## घरफोडी

१) पो.स्टे. जलालखेडा :— अंतर्गत देवग्राम नवीन वस्ती येथे दिनांक १९/०४/२०२३ चे १८.०० वा. ते दिनांक २०/०४/२०२३ चे ०४.३० वा. सुमारास फिर्यादी नामे— श्री आशिष रामकृष्णा दोडके, वय ३९ वर्ष, रा. देवग्राम (नवीन वस्ती) हा त्याची पत्नी व मुलगा यांना आणण्याकरीता त्याची सासरवाडी मसोरा येथे गेला असता, दि. २०/४/२०२३ रोजी सायं १६/३० वा. दरम्यान घरी परत आला असता, त्याचे घराचे लोखंडी गेटचे कुलुप तुटलेले दिसले फिर्यादी हा आत गेला असता त्याला त्याचे घराचे दाराचे लॉक व कोंडा तुटलेला दिसला असता फिर्यादी याने आत मध्ये जावुन बघीतले असता कपाटाचे दार उघडे दिसले व सामान अस्ताव्यस्त पडलेले दिसले. फिर्यादी याने कपाटाची पाहणी केली तर कपाटाचे लॉकरमध्ये ठेवलेले एक जुनी ०४ ग्रॅमची अंगठी, १.५ ग्रॅमची छोटी अंगठी, दोन नग नथनी व लहान मुलांची अंगठी ०१ ग्रॅम तसेच ३० सोन्याचे मणी ज्यात दोन डोळ ०४ ग्रॅम फिर्यादीचे पत्नीची सोन्याची पोत ज्यात छोटे ८० मनी व पदक व ०६ ग्रॅम असा एकुण १६.५ ग्रॅम सोने एकुण किमती अंदाजे ५२,५००/—रु. लहान मुलांचे दोन नग चांदीचे कंगन १५ ग्रॅम किंमती ६००/—रु व नगदी ५००/— रु. च्या ०८ नोटा एकुण ४०००/—रु असा एकुण ५७,१००/—रुपयाचा मुद्देमाल कोणीतरी अज्ञात चोराने चोरुन नेला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. जलालखेडा येथे आरोपीविरुध्द कलम ४५७, ३८० भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोहवा पुरुषोत्तम धोंडे ब.नं. ३२२ मो.नं. ८६०५३२२३२२ हे करीत आहे.

२) पो.स्टे. कन्हान :— **अंतर्गत** न्यु टेकाडी गुरूव्दारा येथे दिनांक २०/०४/२०२३ चे २२.०० वा. सुमारास **फिर्यादी नामे— मोहनसिंग हरनामसिंग रोगी, वय ६५ वर्ष, रा. कन्हान** हा गुरूव्दाराची रखवाली करतो. दि. २०/०४/२०२३ रोजी गुरूव्दारामध्ये कार्यक्रम होते कार्यक्रम संपल्यावर गुरूव्दाराच्या बाजुला असलेल्या रूम मध्ये फिर्यादी हा झोपण्यासाठी गेला असता सकाळी ०३/४५ वा. दरम्यान पाहीले असता स्टीलचा अर्धा दरवाजा उघडा होता व भगवान समोर ठेवलेले ६ तलवारी पैकी ५ तलवारी तेथे नव्हत्या व दानपेटी मध्ये ठेवलेले अंदाजे ३५०००/—रू मुद्देमाल कोणीतरी अज्ञात चोराने चोरुन नेला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. जलालखेडा येथे आरोपीविरुध्द कलम ४५७, ३८० भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास सपोनि. मेश्राम मो. नं. ९९२३७९८६८८ हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर